आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१३ मार्च २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तुटवड्याच्या भीतीनं घरगुती वापराच्या सिलिंडरच्या मागणीत सुमारे २५ टक्के वाढ, अफवांवर विश्वास न ठेवण्याचं केंद्र सरकारचं आवाहन, पाइप गॅसच्या वापरावर भर

- आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, पीएम किसान निधीच्या पुढच्या हप्ताच्या वितरणाला सुरुवात

- विविध प्रकारचे आर्थिक धक्के सहन करण्यासाठी देशाची अर्थव्यवस्था सक्षम असल्याचं अर्थमंत्र्यांचं लोकसभेत निवेदन

**आणि**

- महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक विधानसभेत सादर, बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्यांना ७ वर्षाच्या कारावासाची तरतूद

**<><><><><>**

देशाची एलपीजी सिलिंडरची दैनंदिन गरज ५०-५५ लाख असताना आता ही नोंदणी ७० लाखांपर्यंत गेली आहे. अफवांवर विश्वास ठेवल्यानं ही परिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळं नागरिकांनी घाबरुन जाऊ नये आणि गरजेपेक्षा जास्त सिलिंडर खरेदी करु नये, असं आवाहन पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी केलं आहे.

**होल्ड सुजाता शर्मा बाइट १**

पीएनजी आणि सीएनजीचा पुरवठा सर्व ग्राहकांना सुरळीत सुरू आहे. अधिकाधिक ग्राहकांनी पीएनजीचा वापर करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड सुजाता शर्मा बाइट २**

पेट्रोल डिझेलचाही देशात कुठेही तुटवडा नसून अवैध विक्री, साठेबाजीवर कारवाई केली जात असल्याचं त्या म्हणाल्या. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्वेकडे ३ आणि पश्चिमेकडे २४ भारतीय जहाज आहेत, अशी माहिती बंदरं आणि नौवहन खात्याचे विशेष सचिव राजेश सिन्हा यांनी दिली. इंधन आणि वस्तूंच्या अखंड पुरवठ्यात अडथळा येऊ नये, अशी मागणी इराणकडे केल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी काल दूरध्वनीद्वारे चर्चा केली आणि चर्चेतून सर्व मुद्दे सोडवण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांविषयीही प्रधानमंत्र्यांनी यावेळी काळजी व्यक्त केल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. आसाममधे गुवाहाटी इथं शेतकरी सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचं वितरण करताना ते बोलत होते. सुमारे ९ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८ हजार ६४० कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरण पद्धतीनं जमा होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितल.....

**होल्ड - बाईट -PM SAMMAN NIDHI**

यावेळी त्यांनी विविध विकासकामांचं लोकार्पण, भूमीपूजन केलं. केंद्रातलं भाजपा सरकार आसाममधल्या बोडो प्रादेशिक परिषद क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील असून त्याकरता पंधराशे कोटी रुपये मंजूर करण्यात आले

असल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली. यावेळी त्यांनी विरोधी पक्षाच्या कारभारावर टीका केली.

<><><><><>

पुरवठा साखळीतले  व्यत्यय तसंच एलपीजी तुटवड्यासह, कोणत्याही स्वरूपाच्या आव्हानांना सामना करण्यासाठी सरकार सज्ज आहे. विविध प्रकारचे आर्थिक धक्के सहन करण्यासाठी देशाची अर्थव्यवस्था सक्षम असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज लोकसभेत २०२५-२६ या वर्षासाठी अनुदानाच्या पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला उत्तर देत होत्या. जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी सरकारने आर्थिक स्थिरीकरण निधी म्हणून ५७ हजार ३८१ कोटी रुपयांचा प्रस्ताव ठेवल्याचं त्या म्हणाल्या. खतं, अन्न अनुदान आणि संरक्षण सेवा, तसंच रोख खर्चाला मंजुरी देण्यासाठी सरकारने २ लाख ८१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त अतिरिक्त खर्चाचा प्रस्ताव ठेवल्याचं त्या म्हणाल्या. शेतकऱ्यांना खतांची टंचाई भासू नये, यासाठी खत अनुदानापोटी १९ हजार २३० कोटी रुपयांची रक्कम राखून ठेवण्यात आली आहे. तसंच 'विकसित भारत - जी-राम-जी- योजनेसाठी अतिरिक्त ३० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, येत्या १ एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी होईल अशी माहिती त्यांनी दिली. पुरवणी मागण्यांच्या मंजुरीनंतर सभागृहाचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

देशाची सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंधांवर परिणाम करणाऱ्या हिंदी महासागरातल्या सर्व घडामोडींवर सरकारचं बारकाईनं लक्ष असून, या क्षेत्रात भारताचं हित जपण्यासाठी योग्य ती पावलं उचलली जात असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देत होते. हिंदी महासागर क्षेत्रासह जगभरातल्या अन्य देशांबरोबर भारताने स्वतंत्रपणे

संबंध प्रस्थापित केले असून, त्या देशांचे परस्परांबरोबरचे संबंध यापासून पूर्णतः वेगळे असल्याचं ते यावेळी म्हणाले. जागतिक रणनीतीचा भाग म्हणून, चीन गेली अनेक वर्ष हिंदी महासागर क्षेत्रातल्या देशांमध्ये बंदरं आणि पायाभूत सुविधा विकसित करत आहे, याची सरकारला जाणीव आहे. या पार्श्वभूमीवर, भारत आपल्या 'नेबरहूड फर्स्ट' आणि 'ॲक्ट ईस्ट' धोरण, तसंच महासागर दृष्टिकोनाला अनुसरून, शेजारी देशांबरोबर सहकार्य मजबूत करण्यासाठी काम करत आहे, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

सामाजिक न्याय मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी आज लोकसभेत 'तृतीयपंथी व्यक्ती हक्क संरक्षण  सुधारणा विधेयक, २०२६' सादर केलं. 'तृतीयपंथी व्यक्तीहक्क संरक्षण अधिनियम, २०१९' मध्ये सुधारणा करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

राज्यसभेत आज अनेक सदस्यांनी खाजगी विधेयकं सादर केली. त्यात कोल्हापूरचे खासदार धनंजय भीमराव महाडिक यांनी कोल्हापुरी लेदर क्राफ्ट - जतन आणि उपजीविका सुरक्षा विधेयक २०२६ मांडलं. तर काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांनी हवामानाशी जुळवून घेणारी शेती आणि शेतकरी संरक्षण विधेयक २०२५ मांडलं. डॉ. फौजिया खान यांनी गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मांडलेल्या लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण विधेयक, २०२४ वरही आज सभागृहात चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार डॉ. फौजिया खान यांनी गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये हे विधेयक मांडले होते. भाजपाच्या धर्मशीला गुप्ता आणि नामांकित सदस्य सुधा मूर्ती यांनी चर्चेत भाग घेतला.

<><><><>

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ आज विधानसभेत मांडण्यात आलं. धर्मस्वातंत्र्याचं रक्षण करणं, एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट असल्याचं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधेयक मांडताना सांगितलं....

**होल्ड - बाईट - पंकज भोयर**

जबरदस्तीनं धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड या शिक्षेची यात तरतूद आहे.

**<><><><><>**

महिला आणि विद्यार्थिनींना 'मासिक पाळीची रजा' देणारं देशव्यापी धोरण आखण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. अशा तरतुदीमुळे लिंगभेदाबाबतच्या रूढ समजुतींना बळकटी मिळेल, तसंच रोजगार देताना महिलांना प्राधान्य दिलं जाणार नाही,  असं न्यायालयानं हा निर्णय देताना सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागानं आज मुंबईत 'हम दोनों: कहानी देव और गोल्डी की' या पुस्तकाचं प्रकाशन केलं. भारतीय चित्रपट सृष्टीतलं देव आनंद आणि विजय आनंद यांचं सर्जक योगदान तनुजा चतुर्वेदी यांनी या पुस्तकात सविस्तर मांडलं आहे.  यावेळी,   एनीमेशन,   विजुअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स और एक्सटेंडेड रियलिटी क्षेत्राला चालना देण्यासाठी IICT आणि प्रकाशन विभाग यांच्यात एक सामंजस्य करार झाला. या करारानुसार या क्षेत्राशी संबंधित विशेष पुस्तकं प्रकाशित केली जातील, त्यांचं वितरण देशभरातल्या १५ हजार शाळांमधे केलं जाईल.

**//<><><><><>//**